लोकमत

# विद्यापीठात 'एक तास' स्वच्छता मोहीम

## दोन टन कचऱ्याचे संकलन : कुलगुरूंसह अधिकारी सहभागी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून राज्य सरकारने 'स्वच्छता ही सेवा' या उपक्रमांतर्गत 'एक तारीख, एक तास' स्वच्छता राबविण्याच्या आवाहनाला प्रतिसाद देत शिवाजी विद्यापीठाने रविवारी स्वच्छता मोहीम राबविली. केवळ विद्यापीठ परिसरच नव्हे, तर बाहेरील शासकीय तंत्रनिकेतनपर्यंतचा परिसरही स्वच्छ केला. यात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्यासह अनेक अधिकारी सहभागी झाले होते.




शिवाजी विद्यापीठ आणि राजाराम महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी खाऊ गल्ली परिसरात रविवारी स्वच्छता मोहीम राबविली. या मोहिमेत कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांच्यासह अधिकारी सहभागी झाले.

शिवाजी विद्यापीठाच्या सर्व घटकांना स्वच्छतेसाठी परिसर नेमून दिला होता. भर पावसातही प्रत्येक अधिविभागातील शिक्षक, विद्यार्थ्यांसह प्रशासकीय विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्वच्छता केली. विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग आणि राजाराम महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी डॉ. आप्पासाहेब पवार चौकापासून शासकीय तंत्रनिकेतन या मार्गावरील खाऊ गल्ली परिसरात स्वच्छता केली. यामध्ये कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंग जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, तंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ. अमोल कुलकर्णी यांनी सहभाग घेतला. कोल्हापूर महापालिकेचे आरोग्य निरीक्षक सुशांत तावडे आठ कर्मचाऱ्यांसह उपस्थित होते. यावेळी दोन टन कचरा उचलण्यात आला.

- 2 OCT 2023 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात स्वच्छता मोहिमेस प्रतिसाद

## कॅम्पससह बाहेरील परिसराचीही स्वच्छता; खाऊ गल्लीतून दोन टन कचऱ्याचा उठाव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाने 'स्वच्छता ही सेवा' या उपक्रमांतर्गत आयोजित केलेल्या 'एक तारीख, एक तास' ही स्वच्छता मोहीम शिवाजी विद्यापीठामार्फत उत्साहात राबवण्यात आली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली केवळ विद्यापीठ परिसरच नव्हे, तर विद्यापीठ परिसराबाहेरील शासकीय तंत्रनिकेतनपर्यंतचा परिसरही स्वच्छ करण्यात आला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व राजाराम महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी खाऊ गल्ली परिसरात स्वच्छता मोहीम राबवली.**

विद्यापीठाच्या सर्व घटकांना स्वच्छता करावयाचा परिसर नेमून दिला होता. त्यानुसार हलक्या पावसाच्या सरी पडत असतानाही प्रत्येक अधिविभागातील शिक्षक, विद्यार्थ्यांसह प्रशासकीय विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी त्या-त्या परिसराची स्वच्छता केली. तंत्रज्ञान अधिविभाग आणि राजाराम महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी डॉ. आप्पासाहेब पवार चौकापासून ते शासकीय तंत्रनिकेतन या मार्गावरील खाऊ गल्ली परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. यामध्ये कुलगुरू डॉ. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, तंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ. अमोल कुलकर्णी यांनी पूर्णवेळ सहभाग घेतला, तर महानगरपालिकेचे आरोग्य निरीक्षक सुशांत तावडे आठ कर्मचाऱ्यांसह उपस्थित होते. परिसरामधून प्लास्टिकच्या पिशव्या, पोती, ओला व सुका कचरा, प्लास्टिक बाटल्या, मद्याच्या काचेच्या बाटल्या, खाऊ गल्लीतील टाकाऊ अन्नपदार्थ यासह रस्त्याकडेला उगवलेली काटेरी झुडपे व अन्य कचरा गोळा करण्यात आला. दोन टिपर भरून सुमारे दोन टन कचरा या परिसरातून उचलण्यात आला.

- 2 OCT 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातर्फे 'एक तारीख, एक घंटा' स्वच्छता मोहीम

## कॅम्पसच्या बाहेरील परिसराचीही स्वच्छता; खाऊ गल्लीतून दोन टन कचऱ्याचे संकलन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व राजाराम महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी खाऊ गल्ली परिसरात स्वच्छता मोहीम राबवली.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

महात्मा गांधी जयंतीच्या पार्श्वभूमीवर 'स्वच्छता ही सेवा' उपक्रमांतर्गत आयोजित 'एक तारीख, एक घंटा' स्वच्छता मोहीम शिवाजी विद्यापीठामार्फत उत्साहात राबवण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ परिसरासह शासकीय तंत्रनिकेतनपर्यंतचा परिसर स्वच्छ करण्यात आला.

शिवाजी विद्यापीठात प्रत्येक अधिविभागातील शिक्षक विद्यार्थ्यांसह प्रशासकीय विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी परिसराची स्वच्छता केली. तंत्रज्ञान अधिविभाग आणि राजाराम महाविद्यालय येथील एनएसएस स्वयंसेवकांनी डॉ. आप्पासाहेब पवार चौकापासून ते शासकीय तंत्रनिकेतनपर्यंत स्वच्छता मोहीम राबवली.

यामध्ये कुलगुरू डॉ. शिर्केसह कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, एनएसएसचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, तंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ. अमोल कुलकर्णी यांनी सहभाग घेतला. महापालिकेचे आरोग्य निरीक्षक सुशांत तावडे आठ कर्मचाऱ्यांसह उपस्थित होते.

परिसरातून प्लास्टीक पिशव्या, पोती, ओला व सुका कचरा, प्लास्टीक, काचेच्या बाटल्या, टाकाऊ अन्न पदार्थासह रस्त्याकडेला उगवलेली काटेरी झुडपे असा दोन टन कचरा उचलण्यात आला.

- 2 OCT 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षकांनी मानसिकता बदलण्याची गरज

## डॉ. दिगंबर शिर्के; महावीर महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्र


**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : व्यावसायिक शिक्षणाबरोबरच कौशल्याधारित रोजगाराभिमुख शिक्षणासाठी शिक्षण संस्थांनी, तर अध्यापनासाठी शिक्षकांनी स्वतःच्या मानसिकतेत बदल करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी येथे केले.

येथील महावीर महाविद्यालय आणि ऑल इंडिया कॉलेज प्रिन्सिपल असोसिएशनतर्फे आयोजित 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : संधी व आव्हाने' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. के. ए. कापसे, तर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी कक्षाच्या सुकाणू समितीचे राज्याचे अध्यक्ष डॉ. नितीन करमळकर, संस्थेचे सचिव एम. बी. गरगटे प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'पाठ्यपुस्तकीय शिक्षणाच्या पलीकडे जाऊन भारतातील शिक्षणामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडेल.'

डॉ. करमळकर म्हणाले, ''नवीन शैक्षणिक धोरण स्वीकारून उत्तम




**कोल्हापूर : महावीर महाविद्यालयातील राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. शेजारी अ‍ॅड. के. ए. कापसे, डॉ. नितीन करमळकर, एम. बी. गरगटे, प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे.**

पद्धतीने त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आपला दृष्टिकोन बदलला पाहिजे. नवीन धोरणाद्वारे अनुभवाद्वारे शिक्षण देऊन विद्यार्थ्याला पुस्तकी ज्ञानाऐवजी व्यावहारिक ज्ञान दिले पाहिजे.''

प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे यांनी स्वागत केले. डॉ. अजितकुमार चौगले यांनी परिचय करून दिला. डॉ. कल्पना गंगातीरकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. संजय ओमासे यांनी आभार मानले.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिभागामार्फत आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत क्रीडा शारीरिक संचालकाचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. शरद बनसोडे, डॉ. पी. टी. गायकवाड. (फोटो : नाज ट्रेनर)

# खेळाडूंना तंत्रशुद्ध प्रशिक्षण केंद्र उपलब्ध करून देणार

## कुलगुरू शिर्के; विद्यापीठात क्रीडा प्रशिक्षण कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आगामी काळात शिवाजी विद्यापीठातील खेळाडूंना सर्व सुविधायुक्त तंत्रशुद्ध प्रशिक्षण केंद्र उपलब्ध करून देण्याची सोय केली जाईल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिभागामार्फत 'तंत्रशुद्ध क्रीडा प्रशिक्षण व एआययू खेळाडू पात्रता नियमावली' विषयावर विद्यापीठ सलग्न महाविद्यालयातील क्रीडा शारीरिक संचालक यांच्यासाठी एक दिवसीय कार्यशाळा झाली. यावेळी ते बोलत होते.

पहिल्या सत्रात महेंद्र गोखले यांनी विविध क्रीडा प्रशिक्षणामध्ये वयोगटानुसार कसे क्रीडा प्रशिक्षण द्यायला हवे. प्रशिक्षकाने प्रशिक्षण देत असताना खेळाडूची मानसिकता, शारीरिक तंदुरुस्ती आणि आहार या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात अमरावती विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. अविनाश असनारे यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी केले. विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले. प्रा. विजय रोकडे व डॉ. लीना पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कार्यशाळा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी डॉ. एन. डी. पाटील, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. एन. आर. कांबळे, प्रा. किरण पाटील, प्रा. डॉ. सुरेश फराकटे, प्रा. सुचय खोपडे, पृथ्वीराज सरनाईक यांनी परिश्रम घेतले.

पुढारी



कोल्हापूर : शहाजी छत्रपती महाविद्यालयात प्रशासकीय सेवकांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यशाळा उद्घाटनप्रसंगी प्रा. डॉ. ए. एम. गुरव. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, विठ्ठल आंबले, मनीष भोसले आदी.

# सेवकांनी आनंदी जीवनशैली आत्मसात करावी : डॉ. गुरव

## 'शहाजी'मध्ये प्रशासकीय सेवकांसाठी कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सेवकांनी आनंदी जीवन शैली आत्मसात करावी. त्यासाठी रोज व्यायाम, ध्यानधारणा, सकारात्मकता याकडे लक्ष द्यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी केले.

माजी कृषी राज्यमंत्री श्रीपतराव बोंद्रे यांच्या पुण्यतिथीनिमित्त शहाजी छत्रपती महाविद्यालयात प्रशासकीय सेवकांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यशाळा झाली. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते. डॉ. गुरव यांनी 'प्रशासकीय सेवक, अधिकाऱ्यांची भूमिका व जबाबदारी' या विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात, महावीर महाविद्यालयातील डॉ. शिरीष शितोळे यांनी मार्गदर्शन केले.

संस्थेच्या कर्मचारी पतसंस्थेचे चेअरमन विठ्ठल आंबले, संस्थेचे अधीक्षक रुपेश खांडेकर, पतसंस्थेचे उपाध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील, साई हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य संजय पाटील आदींची भाषणे झाली. डॉ. आर. डी. मांडणीकर यांनी प्रास्ताविक, प्रा. पी. के. पाटील यांनी सूत्रसंचालन तर डॉ. के. एम. देसाई यांनी आभार मानले. यावेळी व्ही. वाय. सी. मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. एस. कागले, प्राचार्य एस. आर. वागरे, मुख्याध्यापक वाय. एस. पोवार, व्ही. टी. चौगुले, प्रबंधक मनीष भोसले उपस्थित होते.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा लॉरेन्स अँड मेयो कंपनीसमवेत सामंजस्य करार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने मंगळवारी ऑप्टिक्सच्या क्षेत्रातील आघाडीच्या लॉरेन्स अँड मेयो, मुंबई या कंपनीसमवेत सामंजस्य करार केला. सायबर सिक्युरिटी, ड्रोन तंत्रज्ञान व तत्सम आधुनिक डिजिटल ऑप्टिकल तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने सहकार्य वृद्धीसाठी करार केला आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या सामंजस्य करारावर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, कंपनीच्या वतीने समूह संचालक (विपणन) डॉ. विवेक मेंडोंसा यांनी स्वाक्षरी केल्या. उद्योगामध्ये सामावण्यास तयार अशी प्रशिक्षित तरुणांची फळी घडविण्याच्या दृष्टीने आवश्यक शिक्षण, प्रशिक्षण व तंत्रज्ञान यांची गरज सामंजस्य कराराद्वारे पूर्ण होईल.

डॉ. मेंडोंसा म्हणाले, शिवाजी विद्यापीठासमवेत करारान्वये विद्यार्थ्यांना अत्याधुनिक अभ्यासक्रम, विशेष कोर्सेस, नवसाधनांचा परिचय करून देऊन उद्योगासपूरक मनुष्यबळ निर्माण करण्यास प्राधान्य देण्यात येईल. मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी प्रास्ताविक केले. एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रकाश राऊत यांनी आभार मानले. कार्यक्रमास वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, तंत्रज्ञान अधिविभागप्रमुख डॉ. एस. एन. सपली, इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड लिंकेजिस केंद्राचे समन्वयक डॉ. एस. डी. डेळेकर, संगणकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कविता ओझा, डीएसटी, पुणे येथील माजी संचालक श्रीधर करंदीकर आदी उपस्थित होते.

तरूण भारत

# बुधवारी काळसेकर काव्य पुरस्कार वितरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

- ज्येष्ठ कवी नारायण कुलकर्णी - कवठेकर यांना पुरस्कार

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा सन २०२३ चा 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवी नारायण कुलकर्णी–कवठेकर यांना तर 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' वर्जेश सोळंकी यांना जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा बुधवार ४ ऑक्टोंबर रोजी सकाळी ११.३० वाजता ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस यांच्या हस्ते होणार आहे. विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ डी. टी. शिर्के भूषवणार आहेत.

नियतकालिकांच्या संपादन व लघुनियतकालिक चळवळीत सक्रीय सहभाग असणाऱ्या सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा पुरस्कार देण्यात येत आहे. २१ हजार रूपये आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या वतीने सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सात लाख रूपये शिवाजी विद्यापीठाकडे देणगी स्वरूपात सुपूर्त करण्यात आली होती. 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार'साठी नारायण कुलकर्णी–कवठेकर यांची निवड केली आहे. ते ६१ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व युगवाणी या नियतकालिकाचे संपादक म्हणून कवठेकर यांनी काम केले आहे. समाजजीवनाचा मागोवा घेणाऱ्या त्यांच्या कवितेने मराठी कवितेत आपला स्वतंत्र ठसा उमटवला आहे. तसेच 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' वर्जेश सोळंकी यांना देण्यात आला आहे. दहा हजार रूपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. मानवी वृत्तींचा शोध घेणारी वैशिष्ट्यपूर्ण कविता सोळंकी यांनी समकालीन मराठी कवितेला दिली. पुरस्कार वितरण सोहळ्याला आदित्य काळसेकर, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. अशी माहिती मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले आहे.

लोकमत

# ‘आयबीपीएस’ प्रवेश परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि पुण्याच्या बार्टी संस्थेमध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार सन २०२३-२४ कालावधीकरिता घेण्यात आलेल्या ‘आय.बी.पी.एस.’ प्रवेश परीक्षा रविवारी शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमारतीत सुरळीत पार पडल्या. रविवार, दि. १ ऑक्टोबर रोजी सकाळी ११:०० ते १२:३० या कालावधीत ही परीक्षा पार पडली. विद्यापीठ केंद्रावर ९३ पैकी ६७ विद्यार्थी उपस्थित होते. यातील ५० विद्यार्थी प्रशिक्षणासाठी पात्र ठरणार आहेत, अशी माहिती केंद्राचे डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठात 'स्टार्टअप परिसंस्था' विषयावर उद्या व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फौंडेशन या



इनक्युबेशन सेंटरच्या माध्यमातून विद्यार्थी, शिक्षक व नवउद्योग सुरू करणाऱ्याकरिता दि. ३ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता पदार्थविज्ञान अधिविभागाच्या सभागृहामध्ये डॉ. अरविंद चिंचुरे यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. डॉ. चिंचुरे यांनी देशपांडे स्टार्टअप, हुबळी या प्रथितयश स्टार्टअपचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम केले आहे. व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन नवोन्मेष नवसंशोधन व साहचार्य सेंटरचे प्रा. एम. एस. देशमुख यांनी केले.

पुढारी

# थेट द्वितीय वर्षाकरिता ५ पासून परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया

## शिवाजी विद्यापीठाकडून वेळापत्रक जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये थेट द्वितीय वर्षाकरिता प्रवेश प्रक्रियेंतर्गत ५ ऑक्टोबरपासून परीक्षा अर्ज प्रक्रियेस सुरुवात होणार आहे. याबाबतचे वेळापत्रक विद्यापीठाने संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे.

द्वितीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया उशिरा झाल्याने काही विद्यार्थी अद्याप परीक्षा अर्ज भरू शकलेले नाहीत. त्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या अभियांत्रिकी, आर्किटेक्चर, व औषधनिर्माणशास्त्र थेट द्वितीय वर्षाकरिता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरण्याबाबत विद्यापीठाकडून तारखा प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. त्यानुसार विद्यार्थ्यांना अधिविभाग, महाविद्यालयात ५ ते १२ ऑक्टोबर या कालावधीत विनाविलंब अर्ज करता येणार आहे. १९ ऑक्टोबर अतिविलंब शुल्कासह अंर्जाची मुदत आहे. महाविद्यालय, पदव्युत्तर विभागाने १३ ते १९ ऑक्टोबरदरम्यान परीक्षा अर्ज अप्रुव्ह करायचे आहेत. विद्यापीठात १६ ते २० ऑक्टोबरपर्यंत परीक्षा अर्ज जमा करावेत, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

तरूण भारत

# दुरशिक्षण केंद्राची प्रवेश प्रक्रिया सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या बी. ए., बी. कॉम.,एम. ए., (मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास), एम. कॉम., एम. एस्सी (गणित), एम. बी. ए. या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांची द्वितीय व तृतीय वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे भाग १, २ व ३ आणि रिपीटर विषयांचे ऑनलाईन अर्ज भरणेसाठी विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठ संकेतस्थळावर www.unishivaji.ac.in भेट द्यावी. रिपीटर व फ्रेश अर्ज करण्याची मुदत बुधवार दि. ४ पर्यंत आहे. अधिक माहितीसाठी अभ्यासकेंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी केले आहे.